महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा. क्र. : ना.बँका/डी-४/पत/क/नियंत्रण/९२
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय
दिनांक २१ जानेवारी १९९२

## विषय : नागरी सहकारी पतसंस्थांच्या कामकाजावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी मार्गदर्शक सूचना

# परिपत्रक

अलीकडच्या काळात नागरी सहकारी पतसंस्थांची वाढ बऱ्याच मोठ्या प्रमाणात झालेली असून बऱ्याच नागरी सहकारी संस्था या सभासदांकडून ठेवी स्विकारतात तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून कर्ज घेवून निधी उभारणी करीत असतात. नागरी सहकारी पतसंस्थांचे कामकाजात सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने व नागरी सहकारी पतसंस्था सभासदांना ठेवी ठेवण्यासाठी आकृष्ट करण्याच्या ज्या काही अनिष्ट स्पर्धा आणि प्रथा वाढीस लागल्या आहेत त्याला आळा घालण्यासाठी म्हणून या परिपत्रकीय सूचना देण्यात येत असेल/आहेत.

१) नागरी सहकारी पतसंस्था या सामान्यतः स्थानिक लोकांची गरज भागविण्याच्या दृष्टीने निर्माण केलेल्या असून त्यांचे कार्य हे प्राथमिक संस्थांप्रमाणे चालावे अशी अपेक्षा आहे. त्यामुळे विस्तृत कार्यक्षेत्र असणे हे नागरी सहकारी पतसंस्थांच्या व्यवस्थापनाच्या दृष्टीने अत्यंत बिकट असे होऊन बसते. सबब नागरी सहकारी पतसंस्थांना विस्तृत कार्यक्षेत्र वाढ देऊ नये. नागरी सहकारी पतसंस्थांना कार्यक्षेत्रात शाखा उघडावयाची असल्यास त्यासाठी खात्याची परवानगी मागणे हे पतसंस्थांवर बंधनकारक करावे व अशाप्रकारे शाखाना परवानगी देत असताना सर्व बाबींचा सम्यक विचार करावा. ज्या ठिकाणी सभासदांचे व्यवसाईक अथवा निवासी संबंध असतील तसेच ज्या भागात नागरी पत संस्थांची वाढ विशेष झाली नसेल अशा भागातच शाखा उघडण्यास परवानगी देण्यात यावी.

२) नागरी सहकारी पतसंस्थांनी बिगर सभासदांकडून ठेवी स्विकारू नये. बिगर सभासदांकडून ठेवी स्विकारणे हे बँकिंग रेग्युलेशन ॲक्टप्रमाणे गुन्हा असून त्याबद्दल संस्थेच्या व्यवस्थापकीय मंडळ सदस्यांवर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल होऊ शकतो. या बद्दलच्या स्पष्ट सूचना सर्व नागरी सहकारी पतसंस्थांना देण्यात याव्यात. ज्या नागरी सहकारी पतसंस्थांनी बिगर सभासदांकडून ठेवी स्विकारण्याची तरतूद या पूर्वीच उपविधीत अंतर्भूत केलेली असेल ती तरतूद वगळण्याच्या दृष्टीने संबंधित निबंधकांनी या बाबतीत ठोस उपाययोजना करावी.

३) नागरी सहकारी पतसंस्थांनी सभासदांच्या ठेवीवर द्यावयाच्या व्याजदराबाबत या कार्यालयाचे दिनांक २८ नोव्हेंबर १९८९ चे परिपत्रका अन्वये निर्णय घेतला आहे. त्यानुसार नागरी सहकारी पतसंस्था सभासदांना नागरी सहकारी बँक देत असलेल्या व्याज दरापेक्षा १ टक्का यापेक्षा जास्त व्याजदर देऊ नये असे सूचित केलेले आहे. ज्या नागरी सहकारी पतसंस्थांचे उपविधीत सभासदांना ठेवीवर द्यावयाच्या व्याज दराबाबत स्पष्ट तरतूद नसेल तेथे नागरी सहकारी पतसंस्थांनी अशाप्रकारची स्पष्ट तरतूद उपविधीत करणेबाबत सूचना द्याव्यात व संस्था सभासदांच्या ठेवीवर, नागरी सहकारी बँका अशाप्रकारच्या ठेवीवर देत असलेल्या व्याजदरापेक्षा एक टक्का जास्त इतक्या जास्तीत जास्त मर्यादेपर्यंतच्या दराने व्याज देऊ शकेल अशी उपविधी दुरुस्ती करून घ्यावी.

४) नागरी सहकारी पतसंस्थांनी उभारावयाचे एकूण कर्ज (सभासदांकडून घेतलेल्या ठेवीसह) हे स्वनिधीच्या १२ पटीपेक्षा अधिक असू नये. बाहेरील कर्ज उभारण्याची मर्यादा वाढवून मागणारी उपविधीप्रमाणे आल्यास निबंधकांनी ती वरील मर्यादेस अधिन राहून मान्यता द्यावी.

५) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून कर्ज घेत असताना नागरी सहकारी पतसंस्थांना पुढे दिलेल्या मर्यादेतच कर्ज उभारता येईल असेही नागरी सहकारी पतसंस्थांना कळवावे.

| ऑडिट वर्ग | कार्यक्षेत्र | स्वनिधीच्या पट |
|---|---|---|
| अ | महानगरपालिका असलेली शहरे अगर तेथील वॉर्डस् | ४ पट |
| अ | इतर कार्यक्षेत्र | ३ पट |
| ब | महानगरपालिका असलेली शहरे अगर तेथील वॉर्डस् | ३ पट |
| ब | इतर कार्यक्षेत्र | २ पट |
| क | सर्व संस्थांसाठी | १ पट |

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी कोणत्याही परिस्थितीत नागरी सहकारी पतसंस्थेला वरील पेक्षा जास्त कर्ज मंजूर करु नये. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी या पूर्वीच काही पतसंस्थांना या पेक्षा जास्त कर्ज दिलेली असल्यास सदरची कर्ज रक्कम दिलेल्या मर्यादेत आणण्या विषयी ठोस पावले उचलावी. जिल्हा उपनिबंधक यांनी सदरची बाब जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाकडे उपस्थित करून त्या बाबतच्या धोरणाविषयक ठराव मंजूर करून घ्यावा. मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाबतीत शासनाने यापूर्वीचे जा.क्र. सीसीआर २५८-७ सी दिनांक २६-६-१९८९ अन्वये ज्या सूचना दिल्या आहेत त्याचे पालन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने करावे.

वरील सूचनांचे तंतोतत पालन होण्यासाठी सहाय्यक/उपनिबधंक जिल्हा उपनिबंधक, विभागीय सहनिबंधक यांनी सुद्धा लक्ष पुरवावे व आधिक त्याप्रकरणी जरूर ती वैधानिक कारवाई करावी.

यापूर्वीच या कार्यालयाने काही प्रकरणी सबंधित संस्थांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन वर दिलेल्या मार्गदर्शक सूचना शिथिल करून कर्ज उभारण्याची मर्यादा अथवा अन्य काही सवलती दिलेल्या आहेत त्या विशिष्ट प्रकरणी या कार्यालयाचे हे सुधारीत आदेश तूर्त लागू करू नयेत. तथापी मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे अशा सूचना त्यांनाही द्याव्यात. एखाद्या विशिष्ट प्रकरणी संस्थेची आर्थिक परिस्थिती अथवा त्या भागातील विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन वरील मर्यादेमध्ये सूट हवी असली तर समग्र प्रस्ताव या कार्यालयाकडे पाठवावा.

सही/-
व्ही. एस्. गोपालकृष्णन्
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे - १

प्रति, १) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व) २) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व) ३) उप/सहाय्यक निबंधक तालुका/वॉर्ड (सर्व) ४) विभागीय विशेष लेखापरिक्षक सह. संस्था (सर्व) ५) जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सह. संस्था (सर्व) ६) विशेष लेखा परिक्षक (वर्ग १) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (सर्व) ७) मा. चेअरमन, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक (सर्व) त्यांचे विशेष लक्ष परिच्छेद १ (५) कडे अंमलबजावणीसाठी वेधण्यात येत आहे. ८) प्रत सविनय सादर

सचिव, सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर.

जा. क्र. ना. बँका/डी-४/पत/नोंदणी कार्यक्षेत्र/९५
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे कार्यालय पुणे
दिनांक ५ सप्टेंबर १९९५

प्रति,
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था (सर्व)

## विषय : नागरी/ग्रामीण बिगरशेती - पतसंस्था गैर कारभारावर नियंत्रण ठेवणेबाबत.

गेल्या काही वर्षात नागरी ग्रामीण बिगरशेती-पतसंस्थांची वाढ फार मोठ्या प्रमाणात झाली आहे. अशा संस्थांचा मुळ उद्देश सभासदांच्या बिगरशेती विषयक-कर्जाच्या गरजा भागविणे व सभासदांमध्ये काटकसर व बचतीची सवय निर्माण करणे हा आहे. अशा बहुतेक संस्था या आपल्या सभासदांकडून विविध प्रकारच्या ठेवी गोळा करतात व त्यातून गरजू सभासदांना कर्ज पुरवठा करतात.

अशा संस्थांच्या वाढीबरोबरच, त्यांच्या कामकाजाबाबत तक्रारीचे प्रमाणही बरेच वाढले असून अशा संस्था सभासदांच्या ठेवींची योग्य ती काळजी घेत नाहीत, त्यांचे पैसे वेळेला परत करीत नाहीत. अविचारीपणाने नियमबाह्य कर्ज वाटप करतात व संस्थेच्या निधीचा दुरुपयोग करतात अशा तक्रारी वारंवार खात्याच्या अधिकाऱ्यांकडे येत आहेत.

लेखापरीक्षण करून कामकाजातील उणीवा व दोष संस्थांच्या निदर्शनास आणणे व त्या दोषांची पूर्तता करून घेणे आणि पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घेणे तसेच गैर व्यवहार असलेल्या संस्थांचे विरुद्ध योग्य ती कायदेशीर कारवाई करणे शक्य असते. तथापी अशा संस्थांचे लेखापरिक्षण कलम ८१(१) (ब) नुसार प्रमाणित लेखापरिक्षण/चार्टर्ड अकौन्टंट यांचेकडून होत असल्याने "लेखापरिक्षण" माध्यमाचा प्रभावीपणे वापर होत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे नागरी पतसंस्थांमधील गैरप्रकारला आळा बसावा या दृष्टीने खात्यातील विविध स्तरावरील अधिकाऱ्यांना जादा दक्षता घेणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) नागरी सहकारी पतसंस्था निधीचे व्यवस्थापन (Fund Management) योग्यरितीने करीत नाहीत. त्यामुळे संस्थांची तपासणी घेताना या बाबींचा सखोल परामर्ष घेण्यात यावा. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम ३५ नुसार अशा संस्थांना ठेवी व कर्जाच्या रुपाने उभारावयाचा निधी स्वनिधीच्या १० पटीपेक्षा जास्त उभारता येत नाही. बऱ्याच संस्था यापेक्षा खूप जास्त प्रमाणात ठेवी स्वीकारतात व जबाबदारी वाढवून घेतात. अशा संस्थांच्या संदर्भात योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे.

२) बऱ्याच संस्था आकर्षक व्याजदराचे प्रलोभन दाखवून सामान्य जनतेचा पैसा ठेवी म्हणून गोळा करुन कर्जवाटप करतात. कर्ज थकल्यावर ठेवीदारास पैसे परत मिळत नाहीत. अशा व्यवहारांची छाननी होणे आवश्यक आहे.

३) संस्थेच्या पोटनियमातील कर्ज विषयक नियमातील नियम १४ नुसार अशा संस्थांनी एकूण ठेवीच्या १०% रक्कम तरलता म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत गुंतवावयाची असते हे बंधन संस्था पाळतील याची खात्री करावी.

४) नागरी पतसंस्थांचे लेखापरीक्षण दरवर्षी नियमीतपणे होईल याची संबंधीत निबंधकांनी खात्री करुन घ्यावी. प्रत्येक संस्थेच्या लेखापरीक्षण अहवालाची छाननी त्यांनी करावी व दोष दुरुस्ती अहवाल नियमितपणे व वेळेवर येतील याबाबत दक्षता घ्यावी.

५) ज्या संस्थांत गैरप्रकार आढळतील अशा संस्थांचे विरुद्ध विना विलंब योग्य ती कायदेशीर कारवाई करावी.

दरवर्षी जास्तीत जास्त नागरी पतसंस्थांचे इन्स्पेक्शन क्षेत्रीय कर्मचाऱ्यांकडून करुन घेण्याची व्यवस्था संबंधीत निबंधकांनी करावी.

जिल्हा विशेष लेखापरीक्षक यांनी त्यांचे अखत्यारीतील सर्व लेखापरीक्षक/प्रमाणीत लेखापरीक्षक यांना नागरी पतसंस्थांच्या लेखापरीक्षणाच्या संदर्भात घ्यावयाच्या खबरदारीबाबत योग्य त्या सूचना द्याव्यात.

केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयात पाठवावा.

सही/-

मा. आयुक्त यांचे
मान्यतेने

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता

महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे वतीने प्रकाशित.

जा. क्र. ना. बँका/डी-४/पत/नियंत्रण/सन ९८
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे, यांचे कार्यालय,
दिनांक : ३० ऑक्टोबर, १९९८

## परिपत्रक

विषय : नागरी सहकारी पतसंस्थांच्या कामकाजावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्रात गेल्या दहा वर्षात सहकारी पतसंस्थेच्या संख्येत व त्यांच्या ठेवी गोळा करण्यात व कर्ज व्यवहारात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे संस्थेचे व्यवस्थापन हे गुंतागुंतीचे व आवाहनात्मक झालेले आहे. सहकारी पतसंस्थांना मुक्त अर्थव्यवस्थेत सहकारी बँका, राष्ट्रियकृत बँका, खाजगी कंपन्यांना सामोरे जावे लागणार आहे. तसेच नागरी सहकारी पतसंस्थाचे सहकारी चळवळीत स्थान महत्त्वाचे आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या लोकांना, छोट्या उद्योजकांना व स्वयंरोजगार करु इच्छिणाऱ्या युवकांना या पतसंस्था आर्थिक मदत करुन त्यांच्या विकासासाठी प्रयत्न करीत आहेत, राज्यशासनाने नुकतेच जाहीर केलेले स्वयंरोजगारासाठीचे सर्वकाश धोरण विचारात घेता नागरी पतसंस्थांची जबाबदारी व कार्यकक्षा वाढविण्यास बराच वाव निर्माण झाला आहे. त्यामुळे नागरी सहकारी पतसंस्थांच्या कामकाजात व्यवसायिक व्यवस्थापन आवश्यक झाले आहे.

सहकारी पतसंस्था या त्यांच्या सभासदांकडून ठेवी स्विकारतात. काही सहकारी पतसंस्था या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेऊन आपल्या सभासदांना वाटप करतात. सहकारी पतसंस्थेत ठेवीदारांच्या ठेवींना सुरक्षितता प्राप्त होणे आवश्यक आहे. सहकारी पतसंस्था या त्यांच्या सभासदांसाठीच कार्यरत असणे योग्य आहे. काही पतसंस्थामध्ये बिगर सभासद अगर बेनामी सभासदांचे व्यवहार असल्याचे आढळून आले आहे. सहकारी पतसंस्थांमध्ये शिरकाव केलेल्या अशा अनिष्ट बाबींना आळा घालणे आवश्यक आहे. नागरी सहकारी पतसंस्थांचे व्यवस्थापन चोख व व्यवस्थित असण्यासाठी व त्याचे कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी ठेवी गोळा करण्यासाठी अवलंबीत असलेल्या अनिष्ठ स्पर्धा यांना आळा घालण्यासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे परिपत्रकीय सूचना देण्यात येत आहेत.

१) नागरी सहकारी पतसंस्थांमध्ये त्यांच्या नवीन सभासदांना खातेदारांना सभासद होताना अगर संस्थेत बचत खाते उघडताना फोटो घेणे बंधनकारक राहील.

नागरी पतसंस्थांच्या सध्या असलेल्या सभासदांकडूनही काही विशिष्ठ कालमर्यादेत फोटो घेण्यात यावेत. तसेच सभासंदाना नमूना सही कार्ड देण्यात यावे. सभासद करुन घेताना दुसऱ्या सभासदाची ओळख बंधनकारक राहील.

२) नागरी पतसंस्थाचे ठेवीवरील व्याजदर संस्थेच्या सरासरी वाटप कर्जव्याजदरापेक्षा जास्त देऊ नये. यासाठी संस्थेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून कर्ज घेतले असल्यास ठेवीचा दर व वाटप कर्जाचा किमान व्याजदर यामध्ये किमान ३% फरक असावा. संस्था केवळ स्वनिधीतून कर्जवाटप करीत असेल तर हा फरक किमान १% असावा.

३) सध्या नागरी पतसंस्था तरलता ठेवत नाहीत. ठेवींच्या सुरक्षिततेसाठी मागणी असणाऱ्या ठेवी परत करण्यासाठी संस्थेस तरलता ठेवणे आवश्यक आहे. दर महिन्याच्या शेवटी शुक्रवारी विविध प्रकारच्या एकूण ठेवींच्या २०% तरलता ठेवण्यात यावी. यापैकी १% तरलता असावी. तरलता या शब्दाचा अर्थ, "बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट" मध्ये जो नमूद आहे तो अभिप्रेत राहील.

वर नमूद केलेल्या सूचना तालुका सहाय्यक उपनिबंधक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील नागरी सहकारी पतसंस्थांच्या नजरेत आणाव्यात व त्याचे काटेकोर पालन होईल असे पहावे. जिल्हा उपनिबंधक / विभागीय सहा. निबंधक सहकारी संस्था यांनीही या सूचनांचे काटेकोर पालन होईल याची दक्षता घ्यावी व आवश्यक ती वैधानिक कार्यवाही करावी. तसेच पतसंस्थांचे लेखापरिक्षकांनी वरील सूचनांचे अंमलबजावणीबाबत त्यांच्या लेखापरिक्षण अहवालात शेरे नमूद करावेत.

सही/-
सहकार आयुक्त तथा निबंधक,
सहकारी संस्था,
म. रा. पुणे मध्यवर्ती इमारत,
पुणे करिता

जा. क्र. ना. बँका/डी- ४/बँका/पतमाहिती/२००७
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक १ डिसेंबर २००७

# परीपत्रक

राज्यातील नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांच्या सभासदांकडून त्यांनी मागणी केलेली माहिती त्यांना देण्यात येत नसल्याबाबतच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त झालेल्या होत्या. या बाबतच्या वाढत्या तक्रारी विचारात घेता, नागरी सहकारी बँका व पतसंस्था यांना खालील माहिती ही पत संस्थेच्या/बँकेच्या सभासदाने मागणी केल्यास देण्याचे बंधनकारक करण्यात येत आहे -

१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३२ व नियम १९६१ व नियम ३० मधील तरतुदीनुसार संस्थेच्या अधिनियमाची प्रत, नियम व उपविधी, हिशोब तपासणी केलेला संस्थेचा वार्षिक ताळेबंद, नफा तोटा पत्रक, समितीच्या सभासदांची यादी, सभासदांचे नोंदणी पुस्तक, साधारण सभेचे टिपण, समितीच्या सभांचे टिपण ही कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात यावीत.

२) संस्थेच्या कर्जदाराने/जामिनदाराने त्यांच्या कर्जाच्या कागदपत्रा विषयीची माहीती- उदा. मूळ कर्ज मागणी अर्ज, कर्ज मंजुरी पत्र, करारपत्र, वचनचिठ्ठी, स्टेटमेंट ऑफ अकौंटस, कर्ज प्रकरणासोबतची इतर सर्व कागदपत्रे कर्जदारास/जामिनदारास उपलब्ध करुन देण्यात यावीत.

३) तसेच नागरी सहकारी बँकांनी व पतसंस्थांनी खालील माहिती सभासदाने मागणी केल्यास सदर माहिती सभासदांना उपलब्ध करुन द्यावी. तसेच सदरची माहिती पतसंस्थेने / बँकेने कार्यालयाच्या दर्शनी भागावर लावावी.

(अ.) पतसंस्थेचे नाव, (ब) कार्यालयीन पत्ता, (क) नोंदणी क्रमांक (ड) कार्यक्षेत्र, (ई.) मुख्यकार्यालयासहीत शाखा, (एफ) सभासद संख्या (जी) वसुल भाग भांडवल (एच) एकुण राखिव व इतर निधी (आय) ठेवी (जे) कर्जे. (के) संचालक मंडळाकडील कर्जाची टक्केवारी (एल) संस्थांनी/बँकानी बाहेरुन उभी केलेली कर्जे (एम) गुंतवणूक (एन) थकबाकी टक्केवारी (ओ) एनपीए प्रमाण (पी) ऑडिट वर्ग (बब.) वर्षअखेर नफा/तोटा (आर) एकूण कर्मचारी (एस) खेळते भांडवल.

वरीलप्रमाणे सभासदांनी मागणी केलेली माहिती ही पतसंस्थेच्या /बँकेच्या सभासदांना उपलब्ध करुन देण्याचे बंधनकारक करण्यात येत आहे.

सही/-
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रति,
१) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व)
३) अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. मुंबई.
४) सहायक निबंधक सहकारी संस्था (परसेवा) पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन.
५) अध्यक्ष, पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या. पुणे
६) अध्यक्ष, डिपॉझीट गॅरंटी कॉर्पोरेशन लि. मुंबई.

जा.क्र. : ना.बँका/डी-४/शाखा/कामकाज/सरतपस/०८
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे कार्यालय,
दिनांक ४ सप्टेंबर २००८

प्रति,
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था,
(सर्व)

विषय : राज्यातील राज्य कार्यक्षेत्र असणाऱ्या अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्थांचे शाखा/जिल्हास्तरावरील दैनंदिन कामकाजाबाबत.

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र जा.क्र. ना.बँका/डी-४/अड.पतसंस्था/अधिकार/०८ दिनांक २६ ऑगस्ट, २००८

२) या कार्यालयाचे अ.शा.पत्र क्र. सआ/खास/रास्तकृतीसभा/इतिवृत्तांत/०८ दिनांक २६ ऑगस्ट, २००८ चे अ.शा. पत्र

कृपया उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२) राज्यातील अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्थांच्या कामकाजाबाबत वेळोवेळी या कार्यालयाचे स्तरावर तसेच विभागस्तरावर आढावा घेण्यात आलेला आहे. संदर्भ क्र. १ व २ अन्वये अडचणीतील नागरी सहकारी पतसंस्थांच्या अनुषंगाने करावयाच्या कामकाजाबाबत आपवणास यापूर्वीच सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३) राज्यातील सुमारे ११ राज्य कार्यक्षेत्र असणाऱ्या नागरी सहकारी पतसंस्थामध्ये ठेवीदारांना ठेवी परत करणेबाबत अडचणी निर्माण झालेल्या आहेत. राज्य कार्यक्षेत्र असणाऱ्या नागरी सहकारी पतसंस्थांवर या कार्यालयातून संस्थेच्या सर्व शाखा/जिल्हास्तरावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य होत नाही. याकरीता राज्य कार्यक्षेत्र असणाऱ्या नागरी सहकारी पतसंस्थांच्या शाखा ज्या ठिकाणी आहेत अशा ठिकाणच्या उपनिबंधक/सहाय्यक निबंधक आणि त्या जिल्ह्याचे जिल्हा उपनिबंधक यांनी खालीलप्रमाणे कामकाज करावयाचे आहे.

१) आपल्या तालुक्यात/जिल्ह्यात असणाऱ्या संबंधीत संस्थेच्या शाखास्तरावर एकूण किती कर्ज प्रकरणे थकित आहेत? त्यापैकी किती प्रकरणामध्ये म.स.सं. अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्ताव दाखल करावयाचे आहेत? त्यापैकी किती प्रस्ताव प्रत्येक्ष दाखल करण्यात आलेले आहेत? पैकी प्रत्यक्ष संस्थेस देण्यात आलेल्या वसुली प्रमाणपत्राची संख्या किती आहे? आणि अशा प्रमाणपत्रावर संस्थेच्या स्तरावर पुढील कारवाई करण्यात आलेली आहे किंवा नाही? दाखल प्रस्तावापैकी अद्याप वसुली प्रमाणपत्र संबंधीत तालुका सहाय्यक निबंधक/उपनिबंधक यांचे स्तरावरुन अद्याप निर्गमित करण्यात आलेली नाहीत ती तात्काळ निर्गमित करण्यात यावीत.

२) म.स.स. अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राच्या अनुषंगाने संबंधीत संस्थेच्या विशेष वसुली अधिकाऱ्याने जप्ती व लिलावाची प्रक्रिया तात्काळ सुरु केलेली आहे किंवा नाही? याची खात्री करुन त्याबाबत संस्थेच्या वसुली अधिकाऱ्यांना काही अडचणी उद्‌भवत असल्यास त्यांना योग्य ते मार्गदर्शन करुन प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करुन त्यातून थकित कर्जाच्या वसुलीची प्रक्रिया पूर्ण करावी.

३) संबंधीत संस्थेच्या शाखा सुरु आहेत काय? याची खात्री करावी. तसेच शाखा बंद असल्यास शाखा चालू ठेवण्यास व त्या शाखेतून संस्थेचे दैनंदिन कामकाज चालू ठेवण्याबाबत संबंधीत शाखेस सूचना देण्यात याव्यात. त्या शाखेतील ठेवीदारांना ठेवीच्या रकमा कोणत्या दिवशी व ठेव रकमेच्या किती प्रमाणात वाटप केल्या जाणार आहेत? याचे वेळापत्रक शाखास्तरावर प्रसिद्ध करण्यात यावे.

४) शासनाने मान्यता दिलेल्या नागरी सहकारी पतसंस्थांच्या एकरकमी परतफेड योजनेस तालुका/जिल्हास्तरावर वृत्तपत्रे व इतर प्रसिद्धी माध्यमाच्या सहाय्याने जास्तीत जास्त प्रसिद्धी द्यावी. तसेच या योजनेचा लाभ घेवून थकित कर्जदारांनी कर्जाची परतफेड करण्याबाबत त्यांना प्रोत्साहित करण्यात यावे जेणेकरुन संबंधीत संस्थांच्या थकित कर्जाची मोठ्या प्रमाणावर वसुली होवू शकेल.

५) संबंधीत संस्थेच्या शाखा/जिल्हास्तरावरील ठेवीदारांच्या संघटना/संघर्ष समित्या अस्तित्वात आहेत काय? याची शहानिशा करण्यात यावी. संबंधीत संघटना/संघर्ष समितीच्या प्रतिनिधींना विश्वासात घेवून शाखा/जिल्हास्तरावरील कामकाजाचे नियोजन करण्यात यावे. आवश्यकतेप्रमाणे त्यांच्या सभांचे आयोजन करण्यात यावे. त्यांना संस्थेच्या स्तरावरुन/सहकार विभागाच्या स्तरावरुन कर्ज वसुलीसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांची सद्य:स्थिती अवगत करण्यात यावी.

६) संबंधीत संस्थांच्या शाखास्तरावरील एकूण हार्डशिप केसेसची संख्या/रक्कम त्यापैकी रोखीने/ठेव पावतीच्या मॅचींगने परत करण्यात आलेल्या ठेवीची रक्कम इत्यादी माहिती वेळोवेळी घेण्यात यावी. तसेच ठेवीदारांना ठेवीची संपूर्ण रक्कम अदा केली जाते किंवा कसे? याबाबत विशेष लक्ष पुरविण्यात यावे. ठेवीदारांना प्रत्यक्षात अदा करण्यात येणारी रक्कम आणि कागदोपत्री अदा करण्यात आल्याचे दर्शविण्यात येणारी रक्कम यामध्ये तफावत/तक्रार असणार नाही/उद्‌भवणार नाही याची विशेष प्राधान्याने दक्षता घ्यावी.

७) संबंधीत संस्थांच्या शाखास्तरावर आवश्यकतेइतके विशेष वसुली अधिकारी आहेत काय? याची खात्री करण्यात यावी. त्यांची संख्या कमी असल्यास संस्थेच्या शाखास्तरावरील उपलब्ध कर्मचाऱ्यांना तात्काळ कलम १५६ चे अधिकार प्रदान करण्यात यावेत. संस्थेच्या शाखास्तरावर कर्मचारी उपलब्ध नसल्यास संबंधीत तालुका कार्यालयातील कर्मचाऱ्यांना कलम १५६ चे अधिकार प्रदान करावेत. त्यांच्या मदतीने संस्थेच्या शाखास्तरावरील वसुलीचे कामकाज प्राधान्याने पूर्ण करण्यात यावे.

८) संबंधीत संस्थेच्या शाखास्तरावरील वाटप करण्यात आलेल्या कर्जाच्या तारण मालमत्तेची विक्री/हस्तांतर/दान/बक्षीस/नवीन बोजा नोंद झाली आहे काय? याची खात्री करण्यात यावी. तसेच सदर व्यवहार रद्द/अवैध ठरविण्याच्यादृष्टीने कार्यवाही करण्यात यावी.

९) संबंधीत संस्थेच्या शाखास्तरावरुन बोगस नावाने किंवा गैर व्यवहाराद्वारे कर्ज घेवून कर्ज रकमेची/त्यातून निर्माण झालेल्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्यात आलेली आहे काय? याची खात्री करण्यात

यावी. तसेच सदरचे मालमत्ता विल्हेवाटीचे व्यवहार रद्द/अवैध ठरविण्याच्यादृष्टीने कार्यवाही करणेत यावी.

१०) संबंधीत संस्थांच्या शाखास्तरांवरुन वाटप करण्यात आलेल्या कर्ज प्रकरणामध्ये प्रतिष्ठीत/प्रभावशाली थकबाकीदार असल्यास त्यांच्याकडील कर्जवसूलीचे अनुषंगाने धडक मोहीम राबवून कर्जवसुली करण्यात यावी. तसेच आवश्यकतेप्रमाणे मालमत्तेची जप्ती करण्यात यावी.

११) संबंधीत संस्थांच्या शाखास्तरावरुन ज्या ठेव पावतीबाबत पैशाची मागणी करणारी व्यक्ती प्रत्यक्ष उपस्थित रहात नाही. तसेच सदरची ठेव बेनामी असल्याचे सकृत दर्शनी निर्दशनास येत असल्यास अशा बेनामी ठेवपावतीच्या रकमा अदा होणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी. तसेच अशा बेनामी ठेव पावतीच्या रक्कमा जप्त करण्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधीत संस्थेस देण्यात याव्यात.

१२) संबंधीत संस्थांच शाखास्तरावरील संस्थेचे पदाधिकारी/कर्मचारी/कर्जदार/जामीनदार/इतर व्यक्ती यांना संस्थेच्या चाचणी/वैधानिक लेखापरीक्षणातील मुद्यांचे अनुषंगाने फौजदारी गुन्ह्यामध्ये अटक झालेली आहे काय? याची माहिती द्यावी. तसेच त्यांनी जामीन मिळवलेला आहे काय? ज़ामीन देताना त्यांच्यावर कोर्टाकडून ज्या अटी/शर्ती लादण्यात आलेल्या आहेत त्याची संबंधीतांनी पूर्तता केली आहे काय? याची माहिती घेण्यात यावी.

१३) संबंधीत संस्थांच्या शाखेस कर्ज वसुलीसाठी देण्यात आलेल्या उद्दीष्टांची पूर्तता संबंधीत शाखास्तरावरुन विहीत कालावधीत करुन द्यावी. याबाबत संबंधीत सहकार खात्याचा कर्मचारी/अधिकारी यांनी व्यक्तीश: पाठपुरावा करावा.

उक्त नमूद कार्यवाही केल्याबाबतचा संस्थानिहाय/शाखानिहाय जिल्ह्याचा एकत्रित अहवाल दर सोमवारी या कार्यालयाकडे सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**

प्रत माहितीस्तव –

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

२) ठेवीदार संघटना/संघर्ष समिती (सर्व)

प्रत माहितीस्तव सविनय सादर –

१) मा. प्रधान सचिव (सहकार व पणन), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई-३२.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या आर्थिक बाबींच्या नियमनाबाबत...

## महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक सीसीआर-११०९/प्र. क्र. ५६२/७-स

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई – ४०० ०३२ दिनांक २३ जुलै २००९

**प्रस्तावना :** महाराष्ट्र राज्यामध्ये १७,००० पेक्षा जास्त नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था कार्यरत आहेत आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदी या नोंदणी, सदस्य, त्यांचे हक्क आणि दायित्व, संस्थांची कर्ज उभारणी, कर्ज वाटप आणि व्याज आकारणी, संस्थांची मालमत्ता आणि निधी, संस्थांचे व्यवस्थापन, लेखापरीक्षण, चौकशी, निरिक्षण आणि पर्यवेक्षण तसेच परिसमापन यांच्याशी संबंधीत आहेत.

मागील काही वर्षात सहकारी पतसंस्थांच्या कामकाजाची व्याप्ती वाढलेली आहे. तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम/नियम/संस्था पोटनियम यांच्या तरतुदीनुसार पतसंस्थांचे नियंत्रण करण्यामध्ये निबंधकाला अडचणी येत आहेत.

सहकारी पतसंस्थांप्रमाणेच कामकाज करणाऱ्या नागरी सहकारी बँकांचे नियंत्रण करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियासाठी बँकिंग नियमन कायदा १९४९ निर्माण केलेला आहे. त्याचप्रमाणे कामकाज करणाऱ्या नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांची वाढ विचारात घेऊन त्यांच्यासाठी वैधानिकदृष्ट्या नियमन करण्याच्या कायदेशीर तरतुदी असणे आवश्यक आहे.

वैधानिकदृष्ट्या नियमन करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये प्रकरण समाविष्ट करणे आवश्यक आहे. सदर प्रकरण समाविष्ट करण्यासाठी अभ्यासगट स्थापन करणे आणि अभ्यासगटाच्या शिफारशीनुसार नियंत्रणात्मक कायदा तयार करणे यासाठी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अधिकार देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सहकार आयुक्त व निबंधक यांच्या अध्यक्षतेखाली नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी नियामक मंडळ स्थापन करणे आणि त्याचे उद्देश, रचना व कार्यकक्षा ठरविणे आवश्यक आहे.

त्यानुसार महाराष्ट्र राज्यामधील नागरी/ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी सहकारी पतसंस्थांसाठी नियामक मंडळ स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :** महाराष्ट्र राज्यामधील नागरी/ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी सहकारी पतसंस्था नियामक मंडळ स्थापन करण्यात येत आहे. त्याचे उद्देश, रचना व कार्यपद्धती सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे हे ठरवतील.

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी या शासन निर्णयाच्या तारखेपासून एक महिन्यामध्ये अभ्यासगट नेमून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये सहकारी पतसंस्थांच्या परिणामकारक नियंत्रणासाठी नवीन प्रकरण समाविष्ट करण्यासाठी कायदा बदलाबाबतचा आवश्यक प्रस्ताव शासनाला सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने

(डॉ. सुधीर कुमार गोयल)

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति, : १) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे. २) महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्या., मुंबई, सुरक्षा भवन, गुलटेकडी, पुणे ३७. ३) निवडनस्ती.

जा.क्र.ना.बँका/डी४/भाग मर्या. वाढ/२०१०
सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था
महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालय
दिनांक २६-३-२०१०

**विषय :** ग्रामीण बिगरशेती/नागरी सहकारी पतसंस्थांमधील सभासदाने धारण करावयाची भाग मर्यादा वाढविणेबाबत.

**संदर्भ :** शासनाचे पत्र क्र.सीसीआर-११०९/प्र.क्र. ३२४/७-स, मंत्रालय मुंबई ३२ दिनांक १८-२-२०१०

# परिपत्रक

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २८ नुसार शेअर्स धारण करण्याबाबतच्या शर्ती नमूद असून त्यानुसार ग्रामीण बिगरशेती व नागरी सहकारी पतसंस्थांच्या सभासदांनी धारण करण्याची कमाल भागांची मर्यादा रु. ५०,०००/- पर्यंत शासनाने दिनांक २९/२/२००० चे अधिसूचनेद्वारे वाढविण्यात आलेली होती. राज्य पतसंस्था फेडरेशन व इतर पतसंस्था यांच्या वारंवार मागणीमुळे सदर मर्यादा वाढविणेबाबतचे प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त होत होते. त्यास अनुसरुन या कार्यालयाने दिनांक २७/२/२००९ च्या पत्रान्वये सविस्तर प्रस्ताव शासनास सादर केलेला होता.

या कार्यालयाने शासनास सादर केलेल्या दिनांक २७/२/२००९ प्रस्तावाचे अनुषंगाने शासनाने संदर्भिय दिनांक १८/२/२०१० च्या पत्रान्वये नागरी सहकारी पतसंस्थांच्या सभासदांनी धारण करावयाच्या कमाल भागाची मर्यादा रु. ५०,०००/- वरुन रु. २.०० लाख पर्यंत वाढविण्याबाबत मंजूरी दिलेली आहे.

तरी आपणास कळविण्यात येते की, सदरची बाब आपल्या अधिनस्त असलेल्या क्षेत्रीय कार्यालयाचे निदर्शनास आणून देण्यात येऊन त्यानुसार सदर परिपत्रकाची अम्मलबजावणी करण्यात यावी.

सही/-
अपर निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे

**प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव :**

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)
२) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)

**प्रत माहितीस्तव :**

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, सहकार व वस्त्रोद्योग विभाग मंत्रालय, मुंबई-३२ यांना शासन पत्र क्र. सीसीआर-११०९/प्रक्र३२४/७-स, मंत्रालय मुंबई ३२ दिनांक १८/२/२०१० ला अनुसरून माहितीस्तव सादर.

प्रत :

३) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन मर्यादित, मुंबई
४) अध्यक्ष, मुंबई/मुंबई कोकण विभागीय पगारदार पतसंस्थांचा सहकारी संघ मर्यादित, मुंबई
५) अध्यक्ष जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशन (सर्व)